# महाराष्ट्र शासन

## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

जाहिरात क्र.मशा./कार्या.३/आस्था.४/पदभरती/७७८/२०१६. . दिनांक - १६/०८/२०१६

---

जिल्हाधिकारी नाशिक यांचे अधिनिस्त उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदांसाठी निवड करणेकरीता व जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांचे आस्थापनेवरील वाहनचालक पदांसाठी निवड करणेकरीता पात्र उमेदवारांकडून जाहिरातीद्वारे खाली दर्शविलेल्या कालावधीत www.nashik.nic.in व www.nashikbharti.com या संकेत स्थळावर फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहे.

| क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | संभावित दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा कालावधी | दि. २०/८/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि. २९/८/२०१६ रोजी सायंकाळी ०६.००वाजेपावेतो |
| २ | भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | दि.२२/८/२०१६ ते ३१/८/२०१६ (भारतीय स्टेट बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) |
| ३ | परीक्षेकरीता उमेदवारांचा अर्जासंबंधी तक्रार/उणीवा दाखल करणेचा कालावधी | दि. ०२/९/२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ४ | लेखी परिक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | दि. ५/९/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून परिक्षेच्या दिनांकापावेतो |

| क्र. | पदाचे नाव | लेखी परिक्षेचा दिनांक व वेळ | |
|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ |
| १ | तलाठी (पेसा क्षेत्रातील) | ११/०९/२०१६ | स.११.०० ते दु.०१.०० |
| २ | तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) | ११/०९/२०१६ | स.११.०० ते दु.०१.०० |
| ३ | वाहनचालक | परीक्षेचा दिनांक व वेळ नंतर जाहिर करणेत येईल. | |

परीक्षा शुल्क विहीत चलनाद्वारे बँकेत जमा करण्याचा अंतिम दिनांक - ३१/८/२०१६ (बँकेच्या वेळेपर्यंत)

१) www.nashik.nic.in व www.nashikbharti.com या संकेतस्थळावर तलाठी पदासाठी व वाहनचालक पदासाठी पात्रतेच्या सविस्तर अटी व शर्ती नमुद असुन उमेदवारांनी सदर संपुर्ण माहिती काळजीपुर्वक समजुन घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावे. प्रस्तुत पदाकरीता उक्त संकेतस्थळावरुन विहीत ऑनलाईन पध्दतीने केलेलेच अर्ज व विहीत चलनाद्वारे परीक्षा शुल्क स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरतीच्या प्रक्रियेची अद्यावत माहिती घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२) अतिरीक्त संवर्ग,आंतरविभागीय समायोजन,विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी व अन्य कारणांमुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी किंवा जास्त होणे) व आरक्षण / समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

३) नियुक्ती देणेचे नियमांत, पदसंख्येत/आरक्षणात बदल करणे,रद्द करणेचे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, बदल करणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी नाशिक यांना राहतील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण :- नाशिक
दिनांक :- १६/०८/२०१६

(रामदास खेडकर)
सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती, तथा
निवासी उपजिल्हाधिकारी नाशिक

(राधाकृष्णन बी.)
अध्यक्ष जिल्हा निवड समिती,तथा
जिल्हाधिकारी नाशिक